# अंतर्गत लेखापरिक्षकांचा अहवाल

( महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ आणि
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९ (३) अन्वये घ्यावयाचा )

**पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी मर्यादित, १३२९, कृष्णा अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.** या संस्थेचा सोबत जोडलेला दि. ३१.३.२०२१ या दिनांकाचा ताळेबंद व सन २०२०-२१ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल करतो की,

१. **आर्थिक विवरण पत्रकाबाबत अंतर्गत लेखापरिक्षण अभिप्राय :-**

**पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी मर्यादित, १३२९, कृष्णा अपार्टमेंट सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे** ४११ ०३०. या संस्थेचे दि.१/४/२०२० ते दि. ३१/३/२०२१ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. ३१/३/२०२१ या दिनांकाचा ताळेबंद त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक आणि त्या समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणाच्या अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

२. **आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारी मध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षणिय चुकांपासून मुक्त राहतील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व अंमलात आणणे याचा समावेश असेल.

Rajendra G. Dingale
PNA 17102
Certified Auditor

३. **लेखापरिक्षकाची जबाबदारी :-**

आर्थिक हिशोब पत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मानदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी व अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते की ज्या येणे ह्या हिशोबात लक्षणिय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न केलेले दोष आणि रक्कम पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणांमध्ये जमाखर्चाच्या मुल्यांकनाच्या विनियोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण यांचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

**अभिप्राय :-**

६. आमच्या मते आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा १९६० चा कायदा, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थेसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.



Scanned with CamScanner

१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२१ ची संस्थेची स्थिती दर्शवितात.

२. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत ज्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याच्या / तोट्यांची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

७. **इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा आणि तोटा पत्रक तयार करणेत आलेली आहेत.

८. **मी अहवाल देतो की :-**

अ) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत व ते पुरेशे आहेत.

ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.

क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून आलेली विवरणपत्रे योग्य व परिपूर्ण आहेत.

९. आमच्या मताप्रमाणे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरण पत्रकानुसार जुळतात.

१०. **मी पुढे असा अहवाल देतो की :-**

१. या अहवाला संदर्भात ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरण पत्रकानुसार जुळतात.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक अशी ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

Rajendra G. Pingale
PNA 17102
Certified Auditor

स्थळ : पुणे
दिनांक : २१/६/२०२१

राजेंद्र गोरक्ष पिंगळे
प्रमाणित लेखापरिक्षक
सहकारी संस्था, पुणे.
पॅनेल नं. १७१०२

Scanned with CamScanner